# प्रेस नोट

## घरफोडी चोरी करणा-या सराईतास समर्थ पोलीस स्टेशन कडुन अटक मुददेमाल जप्त

समर्थ पोलीस स्टेशन गुन्हा रजि.क्र.१५९/२०१९ भा.द.वि.क.३८० या गुन्हयाचा तपास करीत असताना प्राप्त सी.सी.टी.व्ही.फुटेज च्या अनुशंगाने तपास करुन सी.सी.टी.व्ही. फुटेज मधील संशयीत आरोपी हा रास्तापेठ भागत येणार असल्याची गुप्त बातमीदारांमार्फत माहिती मिळाल्याने तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक श्री.अतकरे, पो.हवा.३०६१ लोणकर, पो.हवा.४१७२ काळे, पो.शि.९८४४ साबळे, पो.शि.८२७९ शितोळे, पो.शि.८११२ भांगले, पो.शि.८३३७ शिंदे, पो.शि.७८९१ कोळी, पो.शि.८२०३ पवार, पो.शि. ८१६० सुर्यवंशी यांनी आरोपी नामे - अल्लाबक्ष महंमद पिरजादे वय - ३० वर्ष धंदा मजुरी रा.भराव वस्ती, जुना बाजार, २१७, मंगळवारपेठ पुणे यास मोठया शिताफिने पकडुन त्याचेकडे गुन्हयाचे अनुशंगाने चौकशी करुन **गुन्हयातील चोरीस गेलेले एकुण १,१०,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने** जप्त केले आहेत. तसेच सदर आरोपी कडुन समर्थ पोलीस स्टेशन कडील १) गु.र.नं.३२/२०१९ भा.द.वि.क. ४५७,३८० २) गु.र.नं.३६/२०१९ भा.द.वि.क. ४५७,३८० ३) गु.र.नं.१४५/२०१९ भा.द.वि.क.४५४,४५७,३८० असे **एकुण ०४ गुन्हे उघडकिस आले आहेत.** सदर आरोपीताविरुध्द खडकी, मुंढवा, लष्कर पोलीस स्टेशन येथे घरफोडी चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी ही मा. श्री. मंगेश शिंदे अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.श्री. सुहास बावचे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१, पुणे शहर, मा. श्री प्रदिप आफळे, सहायक पोलीस आयुक्त, फरासखाना विभाग, पुणे शहर, मा. श्री बाळकृष्ण कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक समर्थ पोलीस स्टेशन पुणे शहर, मा. श्री विनायक साळुंखे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) समर्थ पोलीस स्टेशन पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक अतकरे, पो.हवा.३०६१ लोणकर, पो.हवा.४१७२ काळे, पो.शि.९८४४ साबळे, पो.शि.८२७९ शितोळे, पो.शि.८११२ भांगले, पो.शि.८३३७ शिंदे, पो.शि.७८९१ कोळी, पो.शि.८२०३ पवार, पो.शि. ८१६० सुर्यवंशी यांनी केली आहे.